**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक २२/०३/२०२५ (शनिवार) सकाळ**

---

**पोलीस स्टेशन भिवापुर** :– दिनांक २१/०३/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, अवैध रेती वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नक्षी फाटा येथे नाकाबंदी केली असता ट्रक्टर क्र एम एच ४० एल ७०६१ हे मिळुन आले. ट्रक्टर ला पोलीसांनी थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यात रेती मिळुन आली. वाहन चालक याला नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव समीर रंगरावजी वऱ्हाडे वय ३० वर्ष रा. भिमादेवी रोड,भिवापूर असे सांगितले.त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक्टर मधुन **१)** १ ब्रास रेती आणि **२)** ट्रक्टर क्र एम एच ४० एल ७०६१ आणि त्याला जोडुन असलेली अस्पष्ट क्रमांकाची ट्रॉली **असा एकुण** ५,५५,०००/–**रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

चालक , समीर रंगरावजी वऱ्हाडे वय ३० वर्ष रा. भिमादेवी रोड,भिवापूर **याच्या** विरूध्द पोस्टे भिवापुर येथे **कलम ३०३(२),४९,**३(५) **भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान,सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे. नमुद आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर